जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर हद्दीतील ओढे, नाले साफसफाई, अतिक्रमणमुक्त करून रस्ता रुंदी करावे अन्यथा महानगरपालिकेत 'आमरण उपोषण' करणार

नगर – अहिल्यानगर शहरातील मनपा हद्दीत असणारे ४१ ओढे नाले नष्ट झाल्यामुळे शहरांमध्ये भर पावसाळ्यामध्ये आपत्ती व्यवस्थापन याचे नियोजनाचा अभाव असल्याने व मनपाने नेमून दिलेल्या ठेकेदार व त्याची यंत्रणा अयशस्वी ठरल्याने गेली १० ते १५ वर्षापासून संपूर्ण मॅनेजमेंट होऊन अंतर्गत नालेसफाई व तसेच सीना नदी व अंतर्गत येणारे ओढे, नाले यांची सफाई ठेकेदार एजन्सीला दिले जाते, परंतु यावर कोणताच वचक नसून सीएसआय व एसआय हे फक्त कागदोपत्री ठेकेदारांना काम केल्याचे सर्टिफिकेट देतात, परंतु रस्त्यावर काम होताना दिसत नाही. तसेच सीना नदीचा गाळ जेसीपीने तिथल्या तिथच सरकावला जातो व पुर आल्यानंतर तो गाळ पुन्हा तेथेच येऊन पडतो.



अहिल्यानगर हद्दीतील ओढे, नाले साफसफाई, अतिक्रमणमुक्त करून रस्ता रुंदी करण्यात यावी या मागणीचे निवेदन शिवराष्ट्र सेना पक्षाच्या वतीने देण्यात आले.

तसेच शहरातील ३२ हॉस्पिटल यांची चौकशी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची सक्तीच्या रजेवर गेल्यानंतर झालेली चौकशी होती. पुढे या ३२ हॉस्पिटलच्या काय कारवाई केली, याची मनपाने कुठलीही माहिती दिलेली नाही. हे अचानक हे हॉस्पिटल पावन कसे करून घेतले. हा नागरिकांना पडलेला प्रश्न आहे. तसेच उपनगरातून व शहरातील मध्यवस्तीत येणारे दिल्लीगेट, कापड बाजार, नवी पेठ व जुना बाजार या ठिकाणी वाहने लावण्यास व्यापारी दुकानदार मज्जाव करतात. यासाठी व तसेच प्रत्येक दुकानापुढे लागणाऱ्या चारचाकी व्यावसायिक गाड्यांयामुळे नागरिकांना शहरात पायी चालण्यासाठी साधी वाटही मिळत नाही. मोठमोठ्या सणांना महिला व ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुले यांना फार मोठ्या त्रासातून जावे लागते. या आमरण उपोषणात वरील दोन मुद्यांपैकी या ठिकाणी रस्ता रुंदी करण्यात यावी, असे शिवराष्ट्र सेना पक्षाच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येणार आहे, अशी माहिती पक्षाच्या वतीने करण्यात येणार आहे, अशी माहिती संतोष नवसुपे यांनी दिली.

यावेळी शहराध्यक्ष अक्षय कांबळे, संघटन मंत्री संतोष त्रिंबके, जिल्हाध्यक्ष सतीश खैरे, उत्तर जिल्हाध्यक्ष करण गारदे, भिंगार शहराध्यक्ष राकेश सारवान, कुणाल बैद, नवनाथ मोरे, महिला आघाडी उमा छजलाने, सुनिता चव्हाण, व्यापारी आघाडी प्रमुख विजय पितळे, जय बोरा, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जगधने, माजी नगरसेवक अनिल शेकटकर, ओबीसी आघाडी बाबासाहेब करपे, यशवंत पानसरे, प्रितम परदेशी, निलेश पालवे, देवदत्त पुजारी, मंगल बरगडे, पुनम शिंदे, वैशाली सावंत आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रेरणादायी अक्षरधन...






### खासगी क्षेत्रातील तज्ज्ञांना सरकारी धोरणात स्थान

इलॉन मस्क अखेरीस ट्रम्प प्रशासनाला अलविदा म्हणाले. उद्योगपती मस्क यांची 'डोज'मधून (सरकारी खर्च व नोकरशाही कमी करण्यासाठी विशेष विभाग) एक्झिट ही खाजगी क्षेत्रातील तज्ञांना सरकारी धोरण निर्मितीत उतरवताना कोणती धोक्याची पातळी ओलांडू नये याचा अचूक धडा आहे. अमेरिकेत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जे केले व त्यातून पुढे जे काही घडले ते भारतासाठीही विचार करायला लावणारे आहेत.

एक्झिट घेताना इलॉन मस्क यांनी जाता जाता सांगितलं की फेडरल नोकरशाहीची परिस्थिती त्यांच्या अंदाज अन् अपेक्षेपेक्षा खूपच वाईट आहे आणि वॉशिंग्टनमध्ये सुधारणा करणे हा खरेच एक कठीण संघर्ष आहे.

नवी दिल्ली (अन् सर्व राज्यांच्या राजधानी) याबाबतीत मुळीच अपवाद नाही. त्यामुळे भारताला जर खरोखर खासगी क्षेत्राचा अनुभव वापरायचा असेल तर मस्क प्रकरणावरून बोध घेत अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने, नैतिकतेच्या चौकटीत आणि जनविश्वास जपून करावा लागेल.

मस्क प्रकरण सरकारी यंत्रणेत खासगी क्षेत्रातील तज्ञांचा प्रभावी सहभाग कसा घ्यावा हा आपल्यासाठीही धडा असेल. खरं तर प्रामाणिक, आदर्शवत खासगी तज्ञ ज्यांना राष्ट्र उभारणीत खरा रस आहे त्यांची ध्येयधोरणे, कार्यपद्धती, अंमलबजावणी यांचा योग्य सदुपयोग सरकार व प्रशासनाला घेता येईल.

काही विरोधी पक्ष व टीकाकार वैयक्तिक उद्योजकांवरून आक्षेप घेतातही पण शेवटी तेही वेळ, पैसा, अनुभवांची गुंतवणूक करतातच ना! मागील ७५ वर्षात उच्च नोकर प्रशासन १००% प्रामाणिकपणे, वेळ पडल्यास राज्यकर्त्यांना विरोध करीत कल्याणकारी योजनांत धाडसी पाऊले घेतात का? की कमिशनची साखळी आजही अभेद्य आहे.

किमान राजकीय हस्तक्षेप, उच्च अधिकाऱ्यांचा प्रामाणिकपणा व खासगी तज्ञांचा अनुभव यांची शिदोरी एक झाली तर अर्थव्यवस्था अधिक सशक्त होऊ शकेल. (मुसाफिर)

बच्चू कडू यांच्या 'अन्नत्याग'ला पाठिंबा देण्यासाठी

### प्रहार दिव्यांग क्रांती संघटना १४ जूनला उग्र आंदोलन करणार

नगर – शेतकरी, कष्टकरी, कामगार, दिव्यांग, महिला व अन्य वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी बच्चूभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे ८ जूनपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. परंतु शासनाने रास्त मागण्याबाबत अद्यापपर्यंत कुठलीही दखल न घेतल्याने प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, महाराष्ट्र राज्य यांचा पूर्ण पाठिंबा देण्यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. या निवेदनावर प्रहार दिव्यांग क्रांती संघटना जिल्हाध्यक्ष अॅड.लक्ष्मणराव पोकळे, महिला जिल्हाध्यक्ष कु.लक्ष्मीताई देशमुख, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पोपट शेळके, जिल्हा सचिव हमीद शेख आदींचे सह्या आहेत.

या आंदोलनाला बळ देण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १४ जून रोजी शनिवारी संपूर्ण राज्यभरात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेतर्फे उग्र आंदोलन करण्यात येणार आहे. सदर आंदोलन पूर्णपणे लोकशाही मार्गाने, शांततेत व नियमानुसार पार पडेल, याची ग्वाही देतो. प्रशासनाने याची नोंद घ्यावी व आवश्यक त्या सुविधा व सहकार्य करावे.

# शेतजमिनीकडे जाणारा रस्ता खुला करा अन्यथा १९ जून रोजी उपोषणाचा इशारा

### शेत जमीन बळजबरीने विकत घेण्याच्या उद्देशाने त्रास दिला जात असल्याचा आरोप

नगर – भाळवणी ते ढवळपुरी रस्त्यालगत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबीयांची शेत जमीनीकडे जाणारा शेत पाणंद रस्ता खुला करून देण्याची मागणी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आली आहे. सदर मागणीचे निवेदन प्रभारी निवासी जिल्हाधिकारी अरुण उंडे यांना देण्यात आले. तर सदरील शेत जमीन बळजबरीने विकत घेण्याच्या उद्देशाने मागासवर्गीय कुटुंबीयांना त्रास दिला जात असल्याचा आरोप करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नामदेवराव चांदणे, रामदास साळवे, संतोष शेलार, राजेंद्र आल्हाट, नामदेवराव चांदणे, पी.बी. पाथरे, पांडुरंग घोरपडे, सूर्यभान वैराळ, बापू साळवे, संपत गायकवाड, अजित चौधरी, रमेश वैराळ, आकाश वैराळ, चंदा साळवे, किशोर भालेराव, राजेंद्र चौधरी आदी उपस्थित होते.



भाळवणी ते ढवळपुरी रस्त्यालगत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबीयांच्या शेत जमीनीकडे जाणारा शेत पाणंद रस्ता खुला करून देण्याच्या मागणीचे निवेदन प्रभारी निवासी जिल्हाधिकारी अरुण उंडे यांना सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आली आहे.

भाळवणी येथे मागासवर्गीय वैराळ कुटुंबीय शेती व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करत आहे. मात्र ढवळपूरी येथील काही धनदांडगे व्यक्ती त्यांना शेतजमीन विकत देत नसल्याने वैराळ यांना विविध कारणांनी त्रास देत आहे. कोणत्याही कारणाने भांडण करणे, जीवे मारण्याची धमकी देण्याचे प्रकार करत आहे. नुकतेच वैराळ यांच्या शेतीचा रस्ता त्यांनी दगड व काटे टाकून अडविला आहे. भाळवणी ते ढवळपुरी जाणारा रस्ता वैराळ वस्ती जवळ बंद करण्यात आला असून, वैराळ कुटुंबीयांच्या वस्तीवर कोणतेही वाहन येऊ शकत नाही. भाळवणी ग्रामपंचायतीने दलित विकास निधीतून वैराळ वस्तीसाठी ५ लाख रुपये मंजूर करून रस्त्याचे काम सुरु केले आहे. परंतु सदरील धनदांड्या कुटुंबीयांनी रस्त्याचे काम बंद पाडून रस्ता अडविला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यासंदर्भात पारनेर तहसीलदार यांच्याकडे दाद मागून देखील त्याला कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही. सदरचा रस्ता अडविणाऱ्यांवर कारवाई करून गुन्हा दाखल करावा, तात्काळ अडविलेला रस्ता खुला करावा, अशी मागणी करण्यात आली आहे अन्यथा वैराळ कुटुंबीय सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान, अखिल मातंग समाज चळवळ, मानवीत लोकशाही पक्ष, लहुजी शक्ती सेना यांच्या वतीने १९ जून पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे

### साहेबराव घाडगे पाटील यांचे निधन



नगर – त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव घाडगे पाटील (वय ७०) यांचे १० जून रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यांचा अंत्यविधी नेवासे फाटा येथे करण्यात आला.

त्यांनी प्रवरा महाविद्यालय, भारतीय सैन्य दल व एसटी महामंडळात सेवा केली. मुंबई महानगरपालिका येथे सहआयुक्त म्हणून ८ वर्ष सेवा केली. त्यांच्या मागे ३ भाऊ, २ बहिणी, पत्नी, स्नेहल चव्हाण व श्रुती आमले या दोन मुली, जावई, पुतणे असा परिवार आहे.

### लक्ष्मीबाई म्हसे यांचे वृद्धापकाळाने निधन



राहुरी – कोंडवड (ता.राहुरी) येथील रहिवासी लक्ष्मीबाई सुर्यभान म्हसे (वय ८७) यांचे १० जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर कोंडवड (ता.राहुरी) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जालिंदर, उत्तमराव, नर्सिंग होम व कारखान्याचे मा. संचालक अण्णासाहेब म्हसे यांच्या त्या मातोश्री होत.

### श्रीमती सुंदरबाई गांधी यांचे निधन



श्रीगोंदा – येथील श्रीमती सुंदरबाई पोपटलाल गांधी (वय ७०) यांचे ११ जून रोजी निधन झाले. त्यांच्यावर श्रीगोंदा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीगोंदा सुंदर कलेक्शनचे संचालक अनिल व सुनील (मांडवगणवाला) यांच्या त्या मातोश्री होत.

### राजेंद्र हापसे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – खळेवाडी संगम चौक येथील रहिवासी राजेंद्र मोहन हापसे (वय ४५) यांचे १० जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. भिंगार अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, १ भाऊ, भावजय, २ मुले असा परिवार आहे.

### मंगल हापसे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – खळेवाडी संगम चौक येथील रहिवासी मंगल राजेंद्र हापसे (वय ३५) यांचे ३१ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. भिंगार अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे दीर, भावजय, २ मुले, पुतण्या, पुतणी असा परिवार आहे.



तेलीखुंट वरील चेंबरमधून वाहणारे मैलमिश्रित पाणी बंद करुन हा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी भाजपाचे संजय ढोणे यांनी आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली आहे.

# ड्रेनेज लाईन वारंवार तुंबून चेंबरद्वारे मैलमिश्रित पाणी रस्त्यावरून वाहते

### तेलीखुंट वरील चेंबरमधून वाहणारे मैलमिश्रित पाणी बंद करा : संजय ढोणे

नगर – तेलीखुंट चौक रस्त्यावरील ड्रेनेज लाईन वारंवार तुंबून चेंबरद्वारे मैलमिश्रित पाणी अक्षरशः रस्त्यावरुन वाहते त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे तसेच या परिसरातील व्यावसायिक अक्षरशः त्रस्त झाले आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी लक्ष घालून हा प्रश्न तातडीने मार्गी लावून द्यावा, अशी मागणी भाजपाचे संजय ढोणे यांनी केली

तेलीखुंट परिसरातील चेंबर मधून वाहणारे मैलमिश्रित पाणी प्रश्नाची आयुक्त यशवंत डांगे यांनी पाहणी केली. यावेळी भाजपाचे संजय ढोणे, अजय ढोणे, इंजि. सुरेश इथापे, ए. के. गुगळे, दिलीप दारुणकर, अनिल मोरे, मजहर शेख, निलेश दारुणकर, विकी आव्हाड, विनायक भागवत, अभिजीत ढोणे, भारत ढोणे, धीरज गोडकर बापू गीते, निलेश राठोड, शुभम राऊत आदी उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे यांनी तेलीखुंट परिसरातील पाण्याच्या प्रश्नाची पाहणी करत हा प्रश्न तातडीने हाती घेऊन सोडवला जाईल, असे आश्वासन या परिसरातील नागरिकांना दिले.

# नगर शहराच्या मध्यवर्ती भागातील रस्ते वाहतुकीसाठी कधी खुले होणार?

(पान १ वरुन)

महापालिकेने गुलमोहर रोड वरील पारिजात चौक येथील काम अतिशय तत्परतेने पूर्ण केल्यामुळे तेथील नागरिकांनी महापालिकेच्या आयुक्तांचा सत्कार केल्याचे फोटो सोशल मिडीयावर झळकल्यानंतर शहरातील माळीवाडा, आशा टॉकीज परिसर, माणिक चौक, गांधी मैदान, लक्ष्मी कारंजा, आनंदी बाजार या परिसरातील नागरिकांकडून विविध सवाल उपस्थित केले जात आहेत. या भागातील ड्रेनेज लाईनच्या कामासाठी खोदलेले रस्ते अनेक दिवसांपासून तसेच आहेत. ही कामे अतिशय कासव गतीने सुरु असून किरकोळ कारणांनी अनेक ठिकाणी कामे ठप्प झाल्याचे दिसून येत आहे. या खोदलेल्या रस्त्यांमुळे नागरिकांना वाहने तर सोडाच पायी चालणेही मुश्कील झाले आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

महापालिकेत सध्या प्रशासक राज असल्याने प्रशासनावर व काम करणाऱ्या ठेकेदारांवर कोणाचाच वचक राहिलेला नसल्याने त्यांची मनमानी सुरु आहे. त्यामुळे दाद मागायची कोणाकडे असा प्रश्न नागरिकांसमोर असून या हतबलते मुळे नागरिकांत प्रचंड संताप व उद्विग्नता व्यक्त होत आहे.



अनेक दिवसांपासून खोदून ठेवलेला माणिक चौकातून बाजारपेठेकडे येणारा रस्ता.

# अहिल्यानगर जिल्ह्याच्या काही भागात १४ जूनपर्यंत पाऊस

नगर – जिल्ह्याच्या काही भागात १० ते १२ जून या कालावधीत विजांच्या कडकडाटासह वादळे, हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असून १३ व १४ जून रोजी वादळी वारा, मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांमध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वत:सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१- २३२३८४४ अथवा २३५६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलाचे नव्या जागेत स्थलांतर

## चास येथील रायसोनी कॅम्पसमध्ये १६ जूनपासून नियमित महाविद्यालयीन कामकाज होणार सुरु




नगर – काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुल आता चास (ता.नगर) येथील रायसोनी शैक्षणिक कॅम्पसमध्ये स्थलांतरीत करण्यात आले असून १६ जूनपासून होमिओपॅथी, फार्मसी आणि नर्सिंग या तिनही महाविद्यालयांचे नियमित कामकाज सुरू होणार असल्याची माहिती काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनचे विश्वस्त डॉ.अभितेज सुभाष म्हस्के यांनी दिली.

डॉ.म्हस्के पुढे म्हणाले की, विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नवीन कॅम्पसमध्ये नवीन प्रवेश दिले जातील. तसेच नवीन कॅम्पसमध्ये मुलांसाठी आणि मुलींसाठी मेस सुविधा असलेल्या वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आल्याचे त्यांनी सांगत माजी आमदार कि. बा. उर्फ काकासाहेब म्हस्के यांच्या विचारांचा वारसा जपत वैद्यकीय शिक्षण आणि सेवेचे हे व्रत कायम पुढे सुरु राहणार असल्याचे ते म्हणाले.

विश्वस्त डॉ.दिप्ती म्हस्के–ठाकरे म्हणाल्या की, १७ एप्रिल २०२५ रोजी बोल्हेगाव फाटा येथील कॅम्पसमध्ये घडलेला प्रकार अत्यंत दुर्दैवी होता. मात्र यावेळी संस्थेच्या व्यवस्थापनाने सर्व विद्यापीठे आणि इतर प्रशासकीय संस्थांना या दुर्दैवी घटनेची माहिती तातडीने दिली आणि प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थी, पालक आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी सतत संपर्कात राहत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तात्काळ ऑनलाईन वर्ग सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी व्यवस्थापनाने तात्काळ पाऊले उचलत रायसोनी शैक्षणिक कॅम्पस चास येथील सुरक्षित कॅम्पस निवडला असल्याचे त्या म्हणाल्या.

**जागेचा वाद उच्च न्यायालयात...**बोल्हेगाव फाटा येथील कॅम्पसबाबतचा आमचा वाद हा जागे संदर्भातचा होता आणि त्याबाबत आम्ही उच्च न्यायालयात न्याय मागितला आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया सुरु असून आम्हाला विश्वास आहे की आम्हाला न्याय मिळेल. त्यानंतर लवकरच तिथे कॅम्पस सुरु करण्याचा आमचा प्रयत्न राहील असे डॉ.दिप्ती म्हस्के–ठाकरे म्हणाल्या.

**विद्यार्थी, पालकांसह अनेकांची संकटकाळात साथ...**काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलात १७ एप्रिल रोजी घडलेली घटना अत्यंत धक्कादायक होती. मात्र आम्ही सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने या परिस्थितीला तोंड देत यातून मार्ग काढला. या संकटकाळात सर्वांनी आमच्या पाठीशी उभे राहत आमच्यावर विश्वास दर्शविला याबद्दल आम्ही कायम या सर्वांचे ऋणी आहोत. ही घटना घडली तेव्हा आम्ही एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होवू देणार नाही याची ग्वाही दिली होती. त्यानूसार घडलेल्या प्रकारातून सावरत आम्ही पुन्हा एकदा उभे राहत असल्याची माहिती संस्थेचे सीईओ आर्किटेक्ट समीर ठाकरे यांनी दिली.

# आर्किटेक्ट आशिष व सांची बार्शीकर दांपत्य ट्रिपल आय डी एक्सीलन्स अ‍ॅवॉर्डचे मानकरी



आर्किटेक्ट आशिष बार्शीकर व सांची बार्शीकर दांपत्यास ट्रिपल आय डी एक्सीलन्स अ‍ॅवॉर्डने सन्मानित करताना सरोश वाडिया आदी.

नगर – आर्किटेक्ट फर्म 'मेल्डस्पेस'चे संचालक आर्किटेक्ट आशिष सुधीर बार्शीकर व आर्किटेक्ट सांची जैन बार्शीकर या दांपत्यास नुकतेच मुंबईच्या हॉटेल सहारा स्टारमधील कार्यक्रमात बार्शीकर डिझाईन केलेल्या गृह प्रकल्पास ट्रिपल आय डी या संस्थेचे अध्यक्ष सरोश वाडिया यांच्या हस्ते ट्रिपल आय डी डिझाईन एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड–२०२५ ने सन्मानीत करण्यात आले.

अ‍ॅवॉर्ड वितरण कार्यक्रमास पुरस्कार समीतीचे प्रमुख बिंदी साओलापुरकर तसेच संस्थेचे मानद सचिव शामिनी शंकर जैन आदी उपस्थित होते.

आर्किटेक्ट आशिष बार्शीकर यांनी पुणे येथील व्ही आय टी पिव्हीपी या कॉलेजमधून आर्किटेक्टची पदवी घेऊन अहमदाबाद येथील कै. बाळकृष्ण दोशी यांच्या वास्तुशिल्प कन्सलटंट येथे व नाशिक येथील आर्किटेक्ट संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभव घेतला आहे. आर्किटेक्ट सांची जैन बार्शीकर यांचे शिक्षण मुंबई येथील रचना संसद्स अ‍ॅकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या कॉलेज मधून झाले असुन त्यांनी नाशिकच्या संजय पाटील व अजय सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले आहे.

सध्या बार्शीकर दांपत्य हे दोघेही नगर व नाशिक येथे अनेक नवीन गृह प्रकल्पाचे आर्किटेक्ट म्हणुन कार्यरत आहेत.



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आयटीआयचे ४० प्रशिक्षणार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आयटीआयमधील ४० प्रशिक्षणार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अहिल्यानगर येथील ४० प्रशिक्षणार्थ्यांनी प्लेसमेंटमधून यश संपादन केले आहे. सलग २ दिवस घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतींमध्ये या विद्यार्थ्यांची निवड नामवंत कंपन्यांमध्ये झाली आहे.

३ जून रोजी एपिटोम कॉम्पोनंट्स प्रा. लि., सुपा एमआयडीसी येथे घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीत फिटर, टर्नर, मशिनीस्ट, वायरमन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक व इलेक्ट्रिशियन या ट्रेडसाठी एकूण ९५ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामधून ७ प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आली.

यानंतर ५ जून रोजी Exide Industries Ltd., MIDC, अहिल्यानगर या देशातील आघाडीच्या कंपनीतर्फे दुसरी कॅम्पस मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीत फिटर, टर्नर, मशिनीस्ट, वेल्डर, मेकॅनिक डिझेल, एम.एम.व्ही. आणि इलेक्ट्रिशियन या ट्रेडमधील ११० प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यापैकी ३३ जणांनी यश मिळवले.

या यशामागे संस्थेने घेतलेली विशेष मार्गदर्शन सत्रे, प्रशिक्षणार्थ्यांचे तांत्रिक व संवाद कौशल्य यांचा महत्त्वाचा वाटा आहे. मुलाखतीपूर्वी विद्यार्थ्यांना सादरीकरण कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि आत्मविश्वास वाढवण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. हे यश संस्थेच्या प्रगत कार्यशाळा, अनुभवी मार्गदर्शन, डिजिटल शिक्षण प्रणाली तसेच ऑल द जॉब ट्रेनिंग या सर्वांगीण उपक्रमांचा परिणाम मानला जात आहे.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांनी यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, ग्रामीण भागातील युवकांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देणे आणि त्यांना रोजगारक्षम बनवणे हेच आमचे ध्येय असून हे यश त्याच दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे.

याप्रसंगी संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील, डायरेक्टर जनरल डॉ. पी. एम. गायकवाड, डायरेक्टर (टेक्निकल) सुनील कोल्हापुरे, डायरेक्टर (मेडिकल) डॉ. अभिजीत दिवटे यांच्यासह प्राचार्य ए. व्ही. सूर्यवंशी, उपप्राचार्य श्री. काकडे, गटनिदेशक श्री. पठारे, श्री. भुसे आणि प्लेसमेंट अधिकारी अरुण म्हस्के यांनी यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# गणपती मूर्तिकार संघटनेचा गुलालाची उधळण करत जल्लोष



पीओपी मूर्तीवरील बंदी उठवली असून या निकालाचे अहिल्यानगरमध्ये मूर्तिकार संघटनेच्यावतीने सर्व मूर्तिकारांनी जल्लोषात स्वागत केले. (छाया – समीर मन्यार)

नगर – अहिल्यानगर मूर्तिकार संघटना सन २०११ सालापासून पीओपी गणपतीवरील बंदी विरोधी संघर्षामध्ये काम करत आहे. पीओपीवरील बंदी उठवण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा मूर्तिकार संघटना, प्रांत मूर्तिकार संघटना यांच्यासह प्रत्येक मूर्तिकार कारागीर यांनी वेळोवेळी अनेक आंदोलन करून शासकीय अधिकारी, मंत्री यांना पीओपी बंदी कशी चुकीची आहे व त्यावर षडयंत्र करून बंदी घातली आहे. ती लवकरात लवकर उठवण्यात यावी. याबद्दल वेळोवेळी पाठपुरावा करून न्याय दरबारी आपली बाजू भक्कमपणे मांडली. पीओपीवरील बंदी उठवावी, गणेश मूर्तिकार यांना योग्य तो न्याय द्यावा, ही न्यायालयाकडे मागणी केली. या मागणीला व आंदोलनाला यश आले असून, उच्च न्यायालयाने सर्व म्हणणे ऐकून पीओपी मूर्तीवरील बंदी ९ जून रोजी उठवली असून, या निकालाचे अहिल्यानगरमध्ये मूर्तिकार संघटनेच्यावतीने सर्व मूर्तिकारांनी जल्लोषात स्वागत केले. शहराचे आराध्य दैवत श्री विशाल गणेश मंदिर यांच्या चरणी नतमस्तक होऊन छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शहरातून संघटनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष भरत निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुलालाची उधळण करत ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढली. यामध्ये शहरातील मूर्तीकार उपस्थित होते.

यावेळी भरत निंबाळकर म्हणाले की, राज्य सरकारने यासाठी राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान समितीचे अध्यक्ष शास्त्रज्ञ अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करून पीओपी बद्दलचा शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करून पीओपी वातावरणासाठी हानिकारक नसल्याचा अहवाल मागवला. तो अहवाल उच्च न्यायालयाने (सीपीसीबी) केंद्रीय प्रदूषण नियामक महामंडळाकडे ५ मे रोजी सुपूर्त केला. त्या अनुषंगाने ९ जून रोजी मुंबई उच्च न्यायालयाने पीओपीवरील बंदी उठून निर्मिती, साठवणूक, विक्री आणि स्थापना यासाठी परवानगी दिली आहे. उच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल ऐतिहासिक निर्णय असल्याचा निंबाळकर यावेळी म्हणाले.

संघटनेच्यावतीने न्यायालय तसेच महाराष्ट्र शासन, राजीव गांधी संशोधन केंद्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री आशिष शेलार यांच्या योगदानाबद्दल व शहरातील वसंत लोढा, बापू ठाणगे, कायदा सल्लागार भगवान जगताप, शहरातील सर्व हिंदुत्ववादी संघटना व तरुण मंडळ यांनी दिलेल्या पाठबळाबद्दल त्यांचे सर्वांचे अभिनंदन करून आभार मानले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सेवा, सुशासन व गरिब कल्याण या त्रिसूत्रीवर देशात काम

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर जिल्हा भाजपाच्या कार्यशाळा उत्साहात




जिल्हा भाजपच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे स्वागत करताना शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग.

नगर – काश्मीर मधील ३७० वे कलम रद्द होणे ही स्वातंत्र्या नंतरच्या ७५ वर्षातील सर्वात मोठी उपलब्धी आहे. आजपर्यंत भारतावर झालेल्या हल्ल्यांना भारताने कधीच उत्तर दिले नाही. मात्र पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाल्यापासून प्रत्येक हल्ल्याचा सडेतोड उत्तराने बदला घेतला आहे. असे ठोस निर्णय घेणारे, प्रगल्भ इच्छाशक्ती असलेले पंतप्रधान देशाला लाभणे हे आपले भाग्य आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली देशात सेवा, सुशासन व गरिब कल्याण या त्रिसूत्रीवर पूर्ण काम केले जात आहे. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून त्याच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील रहात अनेक गरीब कल्याणकारी योजना नरेंद्र मोदींनी सुरू केल्या आहेत. देशातील कोट्यवधी नागरिक याचा लाभ घेत आहेत. ११ वर्ष पंतप्रधान पदावर राहून उत्कृष्ट काम करत त्यांनी इतिहास रचला आहे, असे प्रतिपादन जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळास ११ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने अहिल्यानगर शहर व जिल्हा भाजपच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते झाले. यावेळी पदाधिकाऱ्यांना संबोधित करून त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीला लागण्याचे आदेश दिले. यावेळी व्यासपीठावर आ.विक्रमसिंह पाचपुते, अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले, माजी जिल्हाध्यक्ष अरुण मुंडे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुवेंद्र गांधी, शहर जिल्हा उपाध्यक्ष धनंजय जाधव, मनोज कुलकर्णी, अंबादास पिसाळ, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी थोरात, शहराध्यक्ष प्रिया जानवे, सचिन पोटरे, विश्वनाथ कोरडे व विनायक देशमुख आदींसह सर्व जिल्हा कार्यकारणी सदस्य, सर्व मंडल अध्यक्ष, जिल्हा मोर्चा अध्यक्ष, कार्यकारणी व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मंत्री विखे पुढे म्हणाले, विश्व नेता नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या काळास ११ वर्ष पूर्ण होणे ही भूषणवाह व गौरवास्पद गोष्ट आहे. विधानसभा निवडणुकीत जिल्ह्याने महायुतीला जनादेश दिला आहे. भारतीय जनता पार्टीने योग्य रणरीतीने व लोकशाही मार्गाने विधानसभा निवडणुका जिंकल्या आहेत. त्याच रणनीतीवर आता महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपंचायती या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही भारतीय जनता पार्टी जिंकणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हाताला व नेतृत्वाला मोठे यश असल्याने याही निवडणुका भाजप जिंकून शतप्रतिशत भाजप सर्वत्र होणार आहे. या निवडणुकांसाठी पदाधिकाऱ्यांनी तयारीला लागावे. माझ्या मागे पुढे करणाऱ्यांना नव्हे तर पक्षाचे प्रामाणिकपणे काम करणाऱ्याला प्राधान्याने तिकीट दिले जाईल. तिन्ही जिल्हाध्यक्षांनी व नव्या मंडल अध्यक्षांनी आपल्या भागाचा दौरा करून मतदारसंघ पिंजून काढावा. राज्य मंत्रिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संपल्यावर राज्यात कधीही निवडणुका लागण्याची शक्यता आहे.

यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व प्रश्न जाणून घेत उत्तरे दिली. ते म्हणाले संगमनेर, नेवासा व श्रीरामपूर या तालुक्यांमध्ये भाजपचे आमदार नाही त्यामुळे तेथील प्रश्न सोडवण्याची जबाबदारी मी घेतो. देवेंद्र फडणवीस यांनी लोककल्याणासाठी पुढाकार घेतला आहे. अनेक योजना सुरू करून सामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला आहे. देवेंद्र फडणवीसांच्या मार्गदर्शनाखाली जलसंधारणाचे जास्तीत जास्त कामे करून अहिल्यानगर जिल्हा दुष्काळ मुक्त करण्याचा माझा प्रयत्न आहे, असेही मंत्री विखे यांनी सांगितले.

आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्याला संधी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहे. या निवडणुकांसाठी पक्षाने सर्वे सुरू केला आहे. त्यामुळे या सर्वे मध्ये तुमचे नाव यावे यासाठी आपापल्या वॉर्डात, गटात व गणात मोर्चे बांधणी सुरू करा. सर्वेत जर तुमचं नाव आले तर तुमचा विजय दूर नाही. असे सांगून उपस्थित पदाधिकाऱ्यांना निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे लागण्यास त्यांनी सांगितले.

शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते स्वागत करताना म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात ११ वर्ष पूर्ण झाल्याचा आनंद शहर व जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांना झाला आहे. यासाठी ९ ते २१ जून दरम्यान भाजपाच्या वतीने शहरासह जिल्ह्यात भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, असे सांगून कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली.

जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या सर्व नूतन मंडळ अध्यक्षांची लवकरच विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी लवकरात लवकर कागदपत्रांची पूर्तता करावी, असे आवाहन केले.

दिलीप भालसिंग म्हणाले, येणाऱ्या निवडणुकांसाठी सर्व मंडल अध्यक्षांनी बूथ रचनेच्या कामास तातडीने सुरुवात करावी. या निवडणुका पूर्ण ताकतीने लागण्यासाठी बुथ रचना आवश्यक आहे. पक्षाच्या सदस्या नोंदणीसाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतल्याने जिल्ह्यात सदस्य नोंदणी उद्दिष्टाच्या पुढे गेली आहे.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन अशोक गायकवाड यांनी केले. बाबासाहेब वाकळे यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या सुरुवातीला मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गेल्या ११ वर्षात देशात केलेल्या विकासाची सचित्र माहिती देणाऱ्या 'भारताची विकास गाथा' या प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सोशल मिडियाकडे व राजकारणाकडे दुर्लक्ष करावे. कोण कोठे गेले, ठाकरे बंधू, पवार काका पुतणे एकत्र येण्याशी आपल्याला काहीही देणे–घेणे नाही. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निष्ठेने काम करून सामन्यांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे, असा सल्ला मंत्री राधाकृष्ण विखे यांनी यावेळी दिला.






इंडो आयरीश हॉस्पिटल येथे एकल महिलांसाठी आशिक कुटे यांच्या पुढाकारातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# एकल महिलांचे आरोग्य शिबीर घेणे, ही कल्पनाच खूप कौतुकास्पद

## आनंद भंडारी यांचे प्रतिपादन; जगदंब फाउंडेशनचे अशोक कुटे यांच्या पुढाकारातून राज्यातील पहिला उपक्रम

नगर – जगदंब फाउंडेशन अंतर्गत साऊ एकल महिला समिती ही एकल महिलांसाठी मोफत आरोग्य शिबीर घेत आहे, ही कल्पनाच खूप कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे. एकल महिलांसाठी महाराष्ट्रामध्ये एकल महिलांच्या आरोग्याचा असा उपक्रम मी पहिल्यांदा बघत आहे व या शिबिराचे माझ्या हस्ते उद्घाटन होत आहे, हे मी माझे भाग्य समजतो, असे उद्गार अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी काढले.

आर सी एफ कंपनी मुंबई, इंडो– आयरीश हॉस्पिटल, नगर, जगदंब फाउंडेशन अंतर्गत साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वटपौर्णिमेच्या दिवशी १० जून रोजी तपोवन रोड येथील इंडो आयरीश हॉस्पिटल येथे एकल महिलांसाठी आशिक कुटे यांच्या पुढाकारातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये डॉ. प्रतिभा पवार, डॉ. स्वाती मैड, डॉ. अंशू महेश मुळे यांनी महिलांची आरोग्य तपासणी केली. महिलांना डॉ. अंशु मुळे यांचे मानसिक आरोग्यावरचे मार्गदर्शन खूप भावले. गरजेनुसार १५ दिवस पुरेल एवढी गोळ्या औषधे गरजू महिलांना देण्यात आली. कॅन्सरची प्राथमिक लक्षणे, तपासणी करण्यात आली. आता भविष्यात पूर्ण जिल्हाभर अशी शिबिर घेणार असल्याची माहिती प्रतिभा हेरंब कुलकर्णी यांनी दिली.

या मोफत शिबिरासाठी साऊ ट्रस्टच्या प्रतिभा हेरंब कुलकर्णी, जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, इंडो आयरीश हॉस्पिटलचे संचालक डॉ. दिलीप जोंधळे, प्रकाश इथापे, कारभारी गरड, मिलिंद साळवे, डॉ.रेवणनाथ पवार, बाजीराव खांदवे, राकेश जोंधळे, नितीन लिगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबीर यशस्वी होण्यासाठी सुजाता गोरे, अश्विनी झरेकर, मेघा वरखेडकर, इंजी. योगेश हजारे, संध्या देशमुख, रवींद्र सातपुते यांनी प्रयत्न केले.

# नगर येथील अनुराधा मिश्रा यांनी दिल्लीतील राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत पटकाविले २ सुवर्ण

## स्पेन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



अनुराधा मिश्रा यांनी नॅशनल सब ज्युनिअर पॉवर लिफ्टिंग अ‍ॅण्ड डेडलिफ्ट अनइक्युपेटेड चॅम्पियनशिप स्पर्धेत दोन सुवर्ण पदक पटकाविले.

नगर – येथील अनुराधा मिश्रा यांनी नॅशनल सब ज्युनिअर पॉवर लिफ्टिंग अ‍ॅण्ड डेडलिफ्टअनइक्युपेटेड चॅम्पियनशिप स्पर्धेत दोन सुवर्ण पदक पटकाविले. नुकतीच ही राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा दिल्ली रोहिणी येथे पार पडली. यामध्ये ३० पेक्षा अधिक महिला स्पर्धक सहभागी झाल्या होत्या.

या स्पर्धेत मिश्रा यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांची स्पेन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत मिश्रा भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. दिल्ली रोहिणी येथील राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मिश्रा यांनी ६३ किलो वजनगटात त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन सुवर्णपदकांची कमाई केली.

मिश्रा यांना या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे, राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. मिश्रा या सावेडी येथील जिम स्ट्राईकर मध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे.

# हेल्थकेअर मार्केटिंग असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी संपत पंडित

## उपाध्यक्षपदी संदीप साळवे तर सचिवपदी संतोष राहिंज यांची निवड



हेल्थकेअर मार्केटिंग असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी संपत पंडित यांना नियुक्ती पत्र देताना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय कणसे व पदाधिकारी.

नगर – आरोग्य क्षेत्रात अग्रणीय व महाराष्ट्र पातळीवर कामकारणारी एकमेव संघटना हेल्थकेअर मार्केटिंग असोसिएशन अहिल्यानगरच्या जिल्हाध्यक्षपदी संपत पंडित यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी संदीप साळवे, सचिवपदी संतोष राहिंज, सहसचिवपदी सौरभ वैरागर आणि खजिनदारपदी इरफान शेख सहखजिनदार – सुरज काटकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या सर्व पदाधिकाऱ्यांची निवड २०२५ – २०२६ या एक वर्षाकरिता करण्यात आलेली आहे. पुणे येथील कार्यालयात संघटनेच्या सभासदांची बैठक पार पडली . येणाऱ्या वर्षात विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय कणसे, सुजाता नाईक, जितेंद्र धापसे, मानसिंह चव्हाण, महेंद्र नाईकवाडे तसेच पुणे व छत्रपती संभाजी नगर विभागातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले तसेच सभासदांचा सत्कार करण्यात आला.

नवीन कार्यकारणी पुढील प्रमाणे – अध्यक्ष– संपत पंडित, उपाध्यक्ष– संदीप साळवे, सचिव– संतोष राहिंज, सहसचिव– सौरभ वैरागर, खजिनदार– इरफान शेख सह खजिनदार – सुरज काटकर, किशोर पोखरणा, राजेश पंडित, सुनिल भिसे, श्रीमंत भालेराव, रणजीत घाडगे, अजय गांधी, सोमनाथ वाघ, संतोष शेळके, गणेश अरगडे, अविनाश कुटे, राजू होळकर, सरफराज शेख, वढावकर, गणेश आरगडे, राहुल घोलप हरीश आल्हाट, बिलाल सर, महेश मोरे, अमोल फुंदे, राज गांधी, सुनिल माहनोर, मनोज भुजाडी व इतर सभासद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# विनायक राज प्रतिष्ठानतर्फे सावेडीत १३ जून रोजी मोफत आरोग्य शिबीर

नगर – सध्याच्या बदलत्या वातावरणामुळे वाढणारे आजारांचे प्रमाण चिंताजनक आहेत. आरोग्य तपासणी करता इतर चाचण्या करण्यासाठी नागरिकांना जास्त पैसे देणे अशक्य असते त्यामुळे त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते यामधून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी सावेडीत १३ जून रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत गुलमोहर रोडवरील कमलाबाई नवले स्मारक येथे विनायकराज प्रतिष्ठान तर्फे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष विपुल वाखुरे यांनी दिली.

विनायक राज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी सामाजिक उपक्रम राबविण्याच्या हेतूने सर्वसामान्य नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

या मोफत आरोग्य शिबिरात सर्व रोग निदान तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून आवश्यकतेनुसार उपचार औषधे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये मोफत नेत्र तपासणी मध्ये मोतीबिंदू असणाऱ्यांना शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. तसेच रक्त तपासणी मध्ये थायरॉईड, किडनी, लिव्हर, कॅन्सरमार्कर, रक्तातील चरबी इत्यादी तपासण्या पूर्णपणे मोफत करणार आहेत. याचा लाभ सावेडी उपनगरातील नागरिकांनी घ्यावा, असे प्रदीप वाखुरे यांनी सांगितले.

या शिबिरामध्ये ज्यांना नेत्रदान, अवयव दान करायचे आहे. त्यांना संमती पत्र देण्यात येतील. शिबिरात नाव नोंदणीसाठी ८२ ३७ ३७ ७००७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्जत येथे १५ जून रोजी बौद्ध वधू–वर थेट–भेट मेळावा

नगर – मंगल परिणय वधूवर सूचक मंडळ व बौद्ध संस्कार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर, श्रीगोंदा, जामखेड, पाथर्डी, अकोले, संगमनेर येथील यशस्वी मेळाव्यानंतर प्रथमच कर्जत तालुक्यात बौद्ध वधू–वर थेट–भेट मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मेळावा १५ जून रोजी शिवपार्वती मंगल कार्यालय, कुळधरण रोड, कर्जत, अहिल्यानगर येथे पार पडणार आहे, अशी माहिती आयोजक भाऊसाहेब देठे यांनी दिली. हा मेळावा सकाळी १२ ते ५ या वेळेत हा मेळावा होणार असून, अहिल्यानगर विवाहेच्छुक युवक–युवतींसाठी संवादाचा मंच ठरणार आहे.

शहरात स्थायिक झालेले तसेच नोकरीनिमित्त बाहेर असलेले तरुण–तरुणी व त्यांचे पालक या उपक्रमात सहभागी होणार असून, मुलींच्या १३० व मुलांच्या १२८ नावनोंदणीसह पीडीएफ फाईल स्वरूपात माहितीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या मेळाव्याचे आयोजन पुढील नियोजनानुसार करण्यात आले आहे. सकाळी १२ ते दुपारी २ वाजेपर्यंत नाव नोंदणी, दुपारी २ ते २.३० वाजेपर्यंत प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ, दुपारी २.३० ते ३.४५ वाजेपर्यंत वधू–वरांची नाव नोंदणी फॉर्म वाचन, दुपारी ३.४५ ते ५ वाजेपर्यंत थेट–भेट व चर्चा सत्र, मेळाव्यात सहभागी होणाऱ्या युवक–युवतींसाठी सुसंगत जोडीदाराची निवड करण्याची ही एक संधी असून, समाजातील विवाहविषयक अडचणी सोडवण्यासाठी असा प्रयत्न महत्वाचा ठरणार आहे.

मेळावा यशस्वी करण्यासाठी स्वयंप्रेरित युआ ग्रुप (बुद्ध), कर्जत व परिवर्तन ग्रामीण वाचनालय (शासनमान्य), कर्जत आदींचे सहकार्य लाभत आहे.

# अवघ्या २४ तासातच गुलमोहर रस्ता वाहतुकीसाठी खुला

## सात पोकलेन मशीनच्या सहाय्याने पारिजात चौकातील ड्रेनेजलाईनचे काम युद्धपातळीवर पूर्ण



२४ तासात काम पूर्ण करून गुलमोहर रस्ता वाहतुकीसाठी खुला केल्याने पारिजात चौक येथे नागरिकांनी आमदार संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे, ठेकेदार दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन यांचे आभार मानले.

नगर – ड्रेनेज लाईनच्या कामासाठी वाहतुकीसाठी पारिजात चौक येथे बंद करण्यात आलेला गुलमोहर रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. महानगरपालिकेने ठेकेदारामार्फत ७ पोकलेन मशीनच्या सहाय्याने युद्धपातळीवर काम पूर्ण करून घेत दहा दिवसांऐवजी २४ तासातच काम पूर्ण केले आहे. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली आहे.

२४ तासात काम पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केल्याने पारिजात चौक येथे नागरिकांनी आमदार संग्राम जगताप, आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, ठेकेदार दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन यांचे आभार मानले. यावेळी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, शिरीष जानवे, प्रदीप घोडके, अभय खाबिया, लक्ष्मीकांत पठारे, विशाल साबळे, अशोक दहिफळे, आकाश सोनवणे, निलेश आव्हाड, प्रसाद पाठक, तसेच नरहरीनगर भागातील होमकर, चिंतामणी, सचिन कसबे, दीपेश दाणे, दिपक दळवी, विशाल पालवे आदी गुलमोहर रोड भागातील सर्व नागरिक उपस्थित होते.

दोन दिवसांपूर्वी महानगरपालिकेने पारिजात चौक येथे ड्रेनेज लाईनचे काम करण्यासाठी गुलमोहर रस्ता वाहतुकीसाठी बंद राहणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार काम सुरू करण्यात आले. मात्र, महानगरपालिकेने २४ तासात काम पूर्ण करून १० जून रोजी रस्ता तत्काळ वाहतुकीसाठी खुला केला आहे. युद्धपातळीवर काम पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केल्याने नागरिकांनी आमदार संग्राम जगताप, यशवंत डांगे यांचे आभार मानले आहेत.

# ‘जोगदेस एफर्टस्’चे १० विद्यार्थी डॉ.सी व्ही रमण बालवैज्ञानिक परीक्षेत गुणवत्ता यादीत

नगर – डॉ. सी व्ही रमण बालवैज्ञानिक परीक्षा १३ एप्रिल रोजी पार पडली. त्यामध्ये जोगदेज् एफर्टस् स्कूलचे इ. ७ वी ते ९ वी चे जिल्हास्तरावर १ व तालुका स्तरावर ९ असे एकूण १० विद्यार्थी गुणवत्ता यादीत निवडले गेले. इयत्ता ७ वीआणि ९ वी दोन्ही इयत्तांचे तालुकास्तरीय प्रथम क्रमांक शाळेच्या विद्यार्थ्यांनी पटकावलेले आहेत.

शंखपाल गणेश – ८ वी जिल्हास्तर–४(१२४/१५०), झाल्टे सोहम – ७ वी तालुका–१ (८४/१००), वरखेडे विराट ७ वी तालुकास्तर–३ (८०/१००)), बडे प्रणव ७ वी तालुकास्तर–४ (७८/१००), शेटे सानवी – तालुकास्तर २ (११६/१५०), गुरसाळे वैष्णवी – ८ वी तालुकास्तर–४ (११२/१५०), सावंत रुत्वीज – ९ वी तालुकास्तर–१ (१२०/१५०), जाधव आदित्य – ९वी तालुकास्तर–३ (११४/१५०), खारगे अवधूत–९ वी तालुकास्तर–३ (११४/१५०), आदित्य कांडेकर – ९ वी तालुकास्तर–३ (११४/१५०), श्रेया विधाते ८ वी तालुकास्तर–६ (१०६–१५०)

त्यांना इफर्ट्स अॅक्डमीचे डायरेक्टर प्रोफेसर अशोक जोगदे सर व इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# खुनाचा प्रयत्न, आरोपातून १४ निर्दोष

नगर – गितेवाडी गावातून चिचोंडी, ता. पाथर्डीकडे जाणाऱ्या रोडवर २७/०१/२०१६ रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास राजकीय वैमनस्याच्या कारणावरुन फिर्यादी व त्याचा भाऊ यांना आरोपींनी छोट्या टेम्पोमधून येऊन आरोपी आसाराम पंढरीनाथ गिते व इतर १४ यांनी कुऱ्हाडीने, दगडाने, गजाने, लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन दोघा जखमींना जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणून पाथर्डी पोलिसांनी एकंदर १४ आरोपींचे विरोधात भा.दं.वि. कलम ३०७, १४३, १४७, १४८, १४९, ३४१, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला असता, त्याची चौकशी नुकतीच अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात होऊन त्यामध्ये सर्व १४ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपीतर्फे अॅड. सतिशचंद्र वि. सुद्रिक यांनी काम पाहिले.



नृत्यरंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या नृत्यदर्पणच्या विद्यार्थिनींनी समूह नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

# पुण्यातील नृत्यरंग स्पर्धेत नगरच्या नृत्यदर्पणच्या विद्यार्थिनींचा डंका

नगर – नुकत्याच पुणे येथे झालेल्या नृत्यरंग २०२५ या नृत्य स्पर्धेत अहिल्यानगरच्या नृत्यदर्पण नृत्य अकादमीच्या विद्यार्थिनींनी मोठे यश मिळवत समूह नुत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. पुण्यात स्वरमयी नृत्यनिकेतन व तारे जमीन पर यांच्यावतीने या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यामध्ये नृत्यदर्पण नृत्य अकादमीच्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्राची आध्यात्मिक शान असलेला देवीचा गोंधळ सादर करून प्रथम क्रमांक पटकावले. सहभागी विद्यार्थिनींना अपर्णा थत्ते यांनी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत भरतनाट्यम नृत्य शैलीत मैत्रेयी भावे हिला मोठा गटात प्रथम क्रमांक मिळाला तर श्रावणी तेलंग हिला छोट्या गटात प्रथम क्रमांक मिळाला. तसेच समूह नृत्यामध्ये सायली शिंदे, समृद्धी येमुल, सायली दिवटे, सई देव, संस्कृती बोरुडे, अक्षदा अकुल, आर्थिका अकुल, हर्षदा नांगरे, ईश्वरी शिंदे, ईरा गवळी, वैभवी रेपे, वेदश्री देशमुख, श्रुती खिस्ती, श्रव्या हातवळणे व अदिती खटावकर आदी विद्यार्थिनींनी सहभागी होत उत्कृष्ट सादरीकरण केले. या सर्वांना नृत्यशिक्षिका अपर्णा थत्ते यांचे मार्गदर्शन मिळाले.

# वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज

**प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांचे प्रतिपादन**



पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन नारायण डोह येथे डॉ.एन.जे.पाउलबुधे पॉलिटेक्निक कॉलेज मधील रोपवाटीकेचे वृक्षरोपण करताना प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदी.

नगर – सध्या ऋतुमानात दिवसेंदिवस बदल होत चालला आहे. आता कोणतेही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस पडताना दिसत आहे. यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. त्याचा परिणाम मनुष्याच्या जीवनावर होत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी केले.

पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन नारायण डोह येथे डॉ.एन.जे.पाउलबुधे पॉलिटेक्निक कॉलेज मधील रोपवाटीकेत वृक्षरोपण करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी वृक्षरोपण व संवर्धन काळाची गरज कशी आहे या बाबत विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना सविस्तर माहिती दिली. यावेळी ग्रीन क्लबचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र देशपांडे यांनी वृक्ष लागवड व जागतिक पर्यावरण

## डॉ.पाउलबुधे पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये वृक्षारोपण

यावर माहीती देउन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रबोधन केले.

या प्रसंगी अकॅडेमिक इनचार्ज व शैक्षणिक वर्ष २०२५– २६ चे प्रवेश कक्षाच्या सुविधा सेंटरचे प्रमुख प्रा.जाबीर अली यांनी देखील वृक्षरोपणाचे महत्व विशद करून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या (डि.टी.ई) प्रवेश प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ.एन.जे. पाउलबुधे पॉलिटेक्निक मधील या सुविधा सेंटरचा विद्यार्थी व पालकांनी जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले.

तंत्रशिक्षण संचालनायाचे पॉलिटेक्निक हे कमी खर्चात व कमी वेळेत विद्यार्थ्यांना नोकरी मिळवुन देणारे बहुआगामी तंत्रशाखा आहे, असेही त्यांनी उपस्थितांना समजावुन सांगितले. पॉलिटेक्निकची प्रवेश प्रक्रिया २० मे पासुन सुरू झालेली असुन नाव नोंदणी व फॉर्म निश्चिती १६ जुन पर्यंत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या फॉर्ममधील त्रुटी व तक्रार निवारण १९, २०, २१ जुन पर्यंत करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

वृक्ष रोपणाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



वटपौर्णिमेनिमित्त कृष्णाली फाऊंडेशनच्यावतीने गणेशनगर येथे वडाचे वृक्षारोपण करण्यात आले.

# वटपौर्णिमेनिमित्त महिलांच्या हस्ते वडाचे वृक्षारोपण

## महिला पोलीस, लोकप्रतिनिधी आणि एकल महिलांचा सहभाग; कृष्णाली फाऊंडेशनचा आगळावेगळा उपक्रम

नगर – सुवासिनींच्या सौभाग्याचा सण मानल्या जाणाऱ्या वटपौर्णिमेनिमित्त कृष्णाली फाऊंडेशनच्यावतीने शहरातील गणेशनगर येथे एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये महिला पोलीस अधिकारी, स्थानिक महिला नगरसेविका तसेच एकल महिलांच्या हस्ते वडाचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासह सांस्कृतिक परंपरेला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड देण्यात आली.

वड हे भारतीय संस्कृतीत धार्मिक आणि पर्यावरणीय दृष्टीने अत्यंत पूजनीय आणि उपयुक्त झाड मानले जाते. त्याचा ऑक्सिजन पुरवठा करण्याचा गुण, आणि स्त्रियांनी आपल्या पतीस दीर्घायुष्य लाभावे यासाठी वडाच्या वृक्षाची पूजा करण्याची परंपरा, याचे महत्त्व अधोरेखित करत कृष्णाली फाऊंडेशनने महिलांच्या हाताने वडाचे झाड लावण्याचा उपक्रम राबवला.

वटपौर्णिमा हा सुवासिनीचा सन मानला जातो परंतु कृष्णाली फाऊंडेशन या ठिकाणी एकल महिलांना मान सन्मान दिला आणि त्यांच्या हाताने देखील वडाचे झाडाचे रोपण केले, या सामाजिक कार्यक्रमात जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस दलातील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही उत्साहाने यामध्ये सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमासाठी कृष्णाली फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, माजी महापौर रोहिणीताई शेडगे, पीएसआय शितल मुंगडे, प्रियंका पाटील शेळके, हेड कॉन्स्टेबल वैशाली पठाडे, पोलीस नाईक योगिता साळवे, कॉन्स्टेबल सोनाली भागवत, माजी नगरसेविका वैशाली नळकांडे, सविता शिंदे, जयश्री देवतरसे, गणेशनगर सोसायटीचे उपाध्यक्ष गायत्री सतीश बागडे, आशा शेळके, ताराबाई शिंदे, साधना गरड, शुभांगी भगने, भारती कोमकुल, जयश्री सोनवणे, सुवर्णा इरोळे, ज्योती रासकर, कामिनी बोराडे आदींसह परिसरातील महिला उपस्थित होत्या.

मान्यवरांचा गुलाबाचे रोप देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमासाठी बालाजी फाउंडेशनचे सहकार्य लाभले. यावेळी अध्यक्ष मेजर शिवाजी पठाडे, राज ठाणगे, गणेश शिंदे गणेशनगर सोसायटी चेअरमन उपस्थित होते.

# आत्मनिर्भर भारताचे स्वप्न महिला सक्षमीकरणातून साकारले जाणार

## रवीकुमार पंतम यांचे प्रतिपादन; तीन महिन्यांचे असिस्टंट ड्रेस मेकरचे प्रशिक्षण घेतलेल्या महिला–युवतींना प्रमाणपत्राचे वितरण



भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (नवी दिल्ली) संचलित शहरातील जनशिक्षण संस्थेच्या माध्यमातून तीन महिन्यांचे असिस्टंट ड्रेस मेकरचे प्रशिक्षण घेतलेल्या महिला–युवतींना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

नगर – व्यावसायिक प्रशिक्षणातून महिलांनी स्वत: सक्षम व्हावे. शासनाच्या वतीने महिलांसाठी विविध व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात आले असून, महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी ते उपयुक्त ठरत आहे. जनशिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिलांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांचे सक्षमीकरण सुरु आहे. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न महिला सक्षमीकरणातून साकारले जाणार असल्याचे प्रतिपादन कौशल्य विकासचे सहाय्यक आयुक्त रवीकुमार पंतम यांनी केले.

भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (नवी दिल्ली) संचलित शहरातील जनशिक्षण संस्थेच्या माध्यमातून पाईपलाईन रोड, भिस्तबाग, कसबे मळा येथे महिला व युवतींना तीन महिन्यांचे असिस्टंट ड्रेस मेकरचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रमाप्रसंगी पंतम बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक बाळासाहेब पवार, कार्यक्रम अधिकारी हिम्मत टाकळकर, प्रशिक्षिका ममता गड्डम, रेणुका कोटा, रश्मी पालवे आदींसह प्रशिक्षणार्थी महिला व युवती उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४० महिला व युवतींना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. तसेच पुढील नवीन बॅचचे दीपप्रज्वलनाने प्रारंभ करण्यात आले. या प्रशिक्षणात महिलांना विविध फॅशन डिझाईनचे व शिवणकलेचे कौशल्य शिकवले जात आहे.

बाळासाहेब पवार म्हणाले की, महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करण्याचे काम जनशिक्षण संस्था करत आहे. २००५ पासून शहरात विविध व्यावसायिक प्रशिक्षण महिला व युवतींना दिले जात आहे. वर्षाला दीड हजार पेक्षा जास्त महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना पायावर उभे करण्याचे काम केले जात आहे. ग्रामीण भागातही प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जात असून, प्रशिक्षण देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना उद्योग व्यवसाय उभे करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग व प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या माध्यमातून कर्ज देखील उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणासाठी संस्थेचे चेअरपर्सन उषाताई गुंजाळ, संस्थापक अध्यक्ष डॉ. राधेश्याम गुंजाळ, व्हाईस चेअरमन विजय इंगळे, व्यवस्थापकीय कमिटी सदस्यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# कॅलिडोस्कोप

## इथं चालतो ताऱ्यांचा खेळ!

हल्ली रात्रीच्या वेळी आकाशात पाहिलं तर लुकलुकणारे तारे, चांदण्या दिसण्याचं प्रमाण तुलनेनं बरंच कमी झालं आहे. यामागे शिश्रक कारणं आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे असं होऊ शकतं. पण अशा परिस्थितीतही भारतात निसर्गाचा एक कमाल आविष्कार प्रत्येकालाच आश्चर्यचकित करत आहे.

हा आविष्कार म्हणजे भारतातील अतिशय दुर्गम भागात असणारं एक लहानसं गाव. इथं बाहेरचं कोणी गेलं तर त्यांची दमछाक होते, थंडीनं दातखिळी बसते. इथं दूरदूरपर्यंत कोणीच नसल्यामुळं रात्रीच्या वेळी नुसतं बाहेर वावरणंही धडकी भरवतं. जगातील आणि भारतातील काळोख्या रात्रींसाठी ओळखल्या जाणाऱ्या आणि आकाश अगदी सहजपणे दिसणाऱ्या या ठिकाणाचं, या गावाचं नाव आहे हानले.

**पर्यटकांचा ओघ सुरू**

लडाखच्या पूर्व भागात, चांगथांग पठारावर हे लहानसं गाव आहे. लेहपासून ते साधारण २५० किलोमीटर अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून हे गाव साधारण ४,५०० मीटर (१४,७६० फूट) उंचीवर वसलेलं आहे. ते आपल्या निसर्गरम्य सौंदर्यासह खगोलशास्त्रीय महत्त्वासाठीही प्रसिद्ध आहे. मागील काही वर्षांमध्ये हानलेमध्ये पर्यटकांचा ओघ वाढला असून, याला खगोलशास्त्रीय पर्यटन असंही नाव देण्यात येत आहे.

**जगातील सर्वात उंचावरील वेधशाळा**

हानले येथील वेधशाळा



ही जगातील सर्वात उंचावरील वेधशाळांपैकी एक आहे. ही वेधशाळा आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संस्थांकडून विविध निरीक्षणपर कामांसाठी वापरली जाते. हानलेमध्ये फारच कमी वस्ती आणि कोणतेही शहरीकरण नसल्यामुळं इथं कृत्रिम प्रकाशाचा प्रचंड अभाव आहे. त्यामुळे येथील रात्री सर्वाधिक काळ्याकुट्ट आणि मनात धडकी भरवणाऱ्या असतात. २०२२ मध्ये हानले हे ठिकाण भारताचं पहिलं 'डार्क स्काय रिझर्व्ह' म्हणून घोषित करण्यात आलं आणि साऱ्या जगाचं लक्ष या ठिकाणानं वेधलं. खगोल अभ्यासक आणि ग्रहताऱ्यांमध्ये रमणाऱ्यांसाठी हानले म्हणजे एक पर्वणीच.

**आकाशगंगा दिसते अगदी सहज**

दिवस मावळतीला गेल्यानंतर आणि आकाश निरभ्र असेल तेव्हा हानलेमध्ये रात्रीच्या अंधारात काही अद्वितीय दृश्य आणि ग्रहतारे पाहता येतात. 'मिल्की वे' आणि इतर आकाशगंगा इथून अगदी सहजपणे आणि दुर्बिणीशिवाय पाहता येतात. उल्का वर्षाव, निखळणारे तारे, उल्कावर्षाव, चंद्र, ग्रह आणि उत्तरेकडील प्रकाशरेषा असा अद्भूत नजराणा हानले इथं येणाऱ्या प्रत्येकापुढं सादर करतं. लेहपासून इथं येण्यापर्यंतचा प्रवास तुलनेनं अधिक खडतर आहे. शिवाय हा भाग चीन सीमेनजीक येत असल्यानं अनेकदा इथं काही संवेदनशील भाग ओलांडून पोहोचावं लागतं. प्रवास कितीही मोठा असला तरी हानलेमध्ये येऊन आपल्याला नगण्य भासवणारी भव्य आकाशगंगा आकाशात दिसते तेव्हा इथं येण्याचं चीज झाल्याचीच एकमेव भावना मनात घर करते.

## भारताचा बदलला भूगोल!




भारताची सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७ किलोमीटरने वाढली आहे. म्हणजेच भारताची एकूण सागरी किनारपट्टी आता ११०९८.८१ किलोमीटर इतकी झाली आहे. भारताच्या या वाढलेल्या किनारपट्टीमुळे संशोधक अंचबित झाले आहेत. भारताची सागरी किनारपट्टी वाढण्यामागे अनेक कारणे समोर आली आहेत.

भारताच्या सागरी किनारपट्टीची लांबी ७,५६१.६० किमी इतकी असल्याचे आपण आतापर्यंत शालेय पुस्तकांमधून शिकलो आहोत. तसेच अधिकृत कागदपत्रांमध्येदेखील असाच उल्लेख आढळतो, पण आता भारताच्या सागरी सीमांच्या नवीन गणनेनंतर देशाच्या सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७.२१ किलोमीटर म्हणजेच सुमारे ५० टक्क्यांनी वाढल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये ऑफशोअर बेटे आणि इतर लहान-मोठ्या बेटांचादेखील समावेश आहे.

**सुधारित किनारपट्टी मोजणीला मान्यता**

ही बेटे जुन्या गणनेत समाविष्ट नव्हती. किनारी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी या सुधारित आकृतीला एकमताने सहमती दर्शविली आहे. यामुळे भारताच्या भौगोलिक माहितीमध्ये हा मोठा बदल झाला आहे. केंद्रीय नौवहन मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, नवीन पद्धत वापरून केलेल्या गणनेनंतर सुधारित किनारपट्टीच्या लांबीला अधिकृतपणे मान्यता देण्यात आली आहे. भारताच्या सागरी किनारपट्टीच्या मोजणीचा वाद २०१० पासून सुरू होता. गृह मंत्रालयाच्या मते, १९७० पासून भारताच्या किनारपट्टीची लांबी ७,५६१ किलोमीटर आहे. विविध सरकारी विभागांनी किनारपट्टीसाठी वेगवेगळे आकडे वापरले आहेत. २०१९ मध्ये या मुद्द्याची तपासणी करण्यात आली. किनारपट्टी संवर्धन आणि विकास सल्लागार समिती २०१० पासून या मुद्द्यावर विचारविनिमय करत होती.

**प्रमाण आणि गणना पद्धतीत बदल**

विद्यमान किनारपट्टीच्या लांबीमध्ये इतक्या मोठ्या फरकाचे मुख्य कारण म्हणजे प्रमाण आणि गणना पद्धतीतील झालेला बदल आहे. वेगवेगळ्या स्केलच्या नकाशांवरून किनारपट्टीची लांबी मोजली जाते, तेव्हा त्यात फरक असू शकतो. नकाशा जितका मोठा आणि स्पष्ट असेल तितका लांबीचा डेटा अधिक अचूक असेल. आता केलेल्या गणनेमध्ये खाडी, किनारी बेटे आणि बेटे यासारख्या विविध रचनांचा समावेश आहे. मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार, भारताच्या किनारपट्टीच्या लांबीमध्ये १,२९८ ऑफशोअर बेटे आणि बेटे समाविष्ट आहेत. यामध्ये १०५९ ऑफशोअर बेटे आणि २३९ बेटे आहेत. भारतातील मुख्य भूमीत समाविष्ट असलेल्या राज्यांमध्ये गुजरातच्या सागरी किनारपट्टीची लांबी सर्वाधिक आहे. गुजरातची किनारपट्टी २,३४०.६२ किलोमीटर आहे. त्याच वेळी पुद्दुचेरीच्या किनारपट्टीची लांबी सर्वात कमी म्हणजे ४२.६५ किलोमीटर आहे.

## थायलंडमध्ये मांजरीला अटक

बँकॉक पोलिसांनी अडकलेल्या एका मांजरीची सुटका केली आणि तिला परत अटक केली. प्रत्यक्षात, सुटका केल्यानंतर, मांजरीने पोलिस अधिकाऱ्यांना अनेक वेळा चावा घेतला. म्हणूनच तिला अटक करण्यात आली. आता मांजरीचा 'मगशॉट' व्हायरल होत आहे. पोलिसांनी मांजरीची काळजी घेण्यास सुरुवात केली आहे. बँकॉक पोलिस अधिकारी दा परिंदा पाकिसुक यांनी हरवलेल्या अमेरिकन शॉर्टहेअर मांजरीची असामान्य कहाणी शेअर केली.

साउथ चायना मॉर्निंग पोस्टनुसार त्यांनी मांजरीचे चांगले स्वागत केले आणि तिची काळजी घेण्यास सुरुवात केली. आम्हाला प्रेम देण्याऐवजी, गोंडस गुलाबी हार्नेस घातलेली मांजर अनेक पोलिस अधिकाऱ्यांना ओरबाडू लागली आणि चावू लागली. या मांजरीचे नाव नाब तांग आहे. त्याचा अर्थ 'पैसे मोजणे' असा होतो. एका अधिकाऱ्याने लिहिले, की या मांजरीवर पोलिस अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप आहे आणि तिला ताब्यात घेण्यात आले.



**पोलिस अधिकाऱ्याचा काल्पनिक अहवाल**

अधिकाऱ्याने सांगितले, ती सध्या सर्वोत्तम जीवन जगत आहे. पोलिसच खरे बळी आहेत. पोस्ट व्हायरल होताच अनेकांनी मांजरीला दत्तक घेण्यात रस दाखवला, परंतु आपली प्राथमिकता तिचा खरा मालक शोधणे असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. मांजरीचा मालक दुसऱ्या दिवशी पोलिस ठाण्यात पोहोचला. कथेला एक मजेदार शेवट देण्यासाठी अधिकाऱ्याने मांजरीच्या दृष्टिकोनातून एक काल्पनिक पोलिस अहवाल लिहिला. मला फक्त भूक लागली होती. माझा कोणालाही चावण्याचा हेतू नव्हता, असे त्यात लिहीण्यात आले होते. त्यानंतर अधिकाऱ्याने मांजरीला तिच्या मालकाकडे एका मजेदार चिठ्ठीसह सुपूर्द केले.

## ... म्हणून ही खिडकी वेगळी

आपण रेल्वेने प्रवास करतो. भारतीय रेल्वेचं जाळं संपूर्ण देशभर पसरलं आहे. दूरवरची अनेक राज्यं रेल्वेच्या या जाळ्यामुळे एकमेकांशी जोडली गेली आहेत. रेल्वेशी संबंधित बऱ्याच बाबी आहेत. पण सध्या आपण रेल्वेतल्या खिडक्यांबाबत जाणून घेऊ. ट्रेनमध्ये खिडकीची जागा पकडायला प्रत्येकालाच आवडतं. पण तुम्ही कधी दाराजवळच्या खिडकीत बसला आहात का? ही खिडकी इतर खिडक्यांपेक्षा थोडी वेगळी असते. डब्यातल्या इतर खिडक्यांना तीन सळ्या असतात. मात्र दाराजवळच्या या खिडकीला चार सळ्या बसवलेल्या असतात. याचं कारण काय, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. दरवाज्याजवळच्या खिडकीतून चोरी होण्याचा धोका बराच जास्त असतो. या खिडकीतून आत हात घालून चोरी होऊ शकते. रात्रीच्या वेळी प्रवासी झोपेत असताना या खिडकीतून चोरी होऊ शकते. चार सळ्या लावल्यामुळे हात आत जाऊ शकत नाही आणि चोरी टळू शकते. याच कारणामुळे या खिडकीला एक अतिरिक्त सळी बसवलेली असते.





## भेदभाव पडला महागात

पेरु या देशातल्या एका रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. आता हा दंड का बरं ठोठावण्यात आला असावा? एखादा नियम मोडल्याबद्दल त्यांना दंड ठोठाण्यात आला असावा, असं तुम्हाला वाटत असेल तर ते चूक आहे. कारण महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केल्याप्रकरणी रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. पेरुची राजधानी लिमाच्या समुद्रकिनाऱ्यालगत ला रोजा नॉटिका नावाचं रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटच्या व्यवस्थापनाने महिला आणि पुरुषांसाठी वेगवेगळं मेनूकार्ड तयार केलं. महिलांसाठी तयार केलेल्या मेनूकार्डमध्ये किंमती छापण्यात आल्या नव्हत्या तर पुरुषांना देण्यात येणाऱ्या मेनूकार्डमध्ये पदार्थांच्या नावाशेजारी किंमती छापण्यात आल्या होत्या. मात्र अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. यासाठी रेस्टॉरंटच्या मालकांना ६२ हजार डॉलर म्हणजे जवळपास ४४ लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. महिलांना दिल्या जाणाऱ्या मेनूकार्डमध्ये किंमत न छापण्याबाबत रेस्टॉरंट प्रशासनाचा अजब तर्क आहे. मेनूकार्ड बघताना महिला पदार्थाऐवजी त्याच्या किंमतीकडे जास्त लक्ष देतात. किंमतीचा विचार मनात असल्यामुळे महिलांना जेवणाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे त्यांना किंमत नसलेलं मेनूकार्ड देण्यात येत असल्याचं रेस्टॉरंट व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. हा तर्क योग्य की अयोग्य हे सांगता येत नसलं तरी अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं सांगत लिमामधल्या प्रशासनाने दंड ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे. १९८० मध्ये अमेरिकेतल्या लॉस एंजल्समधल्या एका रेस्टॉरंटनेही महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केला होता. याला विरोध झाल्यानंतर रेस्टॉरंट बंद करावं लागलं.

## वरातीमुळे न्यू यॉर्कमध्ये वाहतूक कोंडी

भारतात लग्नाची चर्चा होत असताना त्यात वरातीचा उल्लेख नसेल, तर तो विषय अपूर्ण राहतो. खरंतर, आपल्या देशात वरातीशिवाय लग्न पूर्ण होत नाही. वरातीमुळे वाहतूक कोंडी होत नाही आणि नाच करणाऱ्यांना घड्याळात १२ वाजले आहे, हे दाखवत नाही, तोपर्यंत मजा येत नाही. न्यू यार्कमध्येही ४०० वऱ्हाडी मंडळींनी रस्त्यावर घातलेल्या गोंधळामुळे रस्ताच जाम झाला. न्यू यॉर्कमधील वॉल स्ट्रीवर वरातीमुळे वाहतूक बंद पडली होती. यावेळी तब्बल ४०० लोक डीजेच्या तालावर एकत्र नाचत होते.

न्यू यार्कमधील या वरातीत ढोलताशा, डीजेसह सर्व व्यवस्था होती. न्यू यार्कमधील वॉल स्ट्रीटमध्ये यापूर्वी कधीही असा रस्ता बंद झाला नव्हता. भारतीय वरातीमुळे असा चमत्कार घडला असून, वाद्यांच्या तालावर चारशे लोकांनी ठेका धरल्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला. त्यांच्या या आनंदावर विरजण टाकायला कुणीच तयार नव्हते. ही बतमी व्हयरल झाल्यावर एका यूजरने म्हटले, ४०० लोकांच्या मिरवणुकीसाठी वॉल स्ट्रीट बंद होऊ शकेल, असे कोणाला तरी वाटले असेल? ही निश्चितच आयुष्यात एकदाच अनुभवायला मिळू शकणारी जादू आहे. एका युजरने लिहिले, यांनी यासाठी काही विशेष परवानगी घेतली होती का? दुसऱ्याने लिहिले, हे निश्चितच उत्तर भारतातील लोकांचे वर्तन आहे. अन्य एका युजरच्या मते अशा कारणांसाठीच ट्रम्प या लोकांना हद्दपार करत आहे.



## सात फेऱ्यांपूर्वीच वधूचा लग्नाला नकार



लग्नाचा मंडप सजवला होता. पुजारी मंत्र म्हणत होते. नातेवाइकांच्या नजरा वधू-वरांवर खिळल्या होत्या. वातावरण आनंदाने भरून गेले होते. पण फक्त सात फेरे शिल्लक असताना वधूने लग्न करण्यास नकार दिला.

आपल्याला हे लग्न करायचे नव्हते, असे तिने स्पष्ट सांगितले. कुटुंब, समाज किंवा नातेवाइकांची पर्वा न करता तिने आपला मुद्दा मांडला. हा निर्णय वधूने इतका अचानक सांगितला की सर्वांनाच धक्का बसला. अनेकांना आश्चर्य वाटले, तर काहींनी तिच्या धाडसाचे कौतुकही केले.

**नेमकं काय घडलं?**

कर्नाटकातील हसन जिल्ह्यातील बुवनहल्ली गावात ही घटना घडली. पल्लवी नावाच्या मुलीचे लग्न अलूर तालुक्यातील रहिवासी वेणुगोपालशी निश्चित झाले होते. सर्व नातेवाईक आनंदाने नाचत होते. वर हातात मंगळसूत्र घेऊन उभा होता आणि पुढच्याच क्षणी सात फेरे घ्यायचे होते तेव्हा पल्लवीने हा निर्णय घेतला आणि संपूर्ण वातावरणात शांतता पसरली.

**वधू तिच्या प्रियकरासह ...**

आपले प्रेम दुसऱ्या व्यक्तीवर आहे आणि आपले आयुष्य त्या व्यक्तीसोबतच घालवायचे आहे, असे तिने सांगितले. हे ऐकून मंडपात बसलेले लोक थक्क झाले. काही लोकांना सुरुवातीला काय घडत आहे यावर विश्वासच बसत नव्हता. मुलीच्या पालकांनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. नातेवाइकांनीही आपापल्या परीने तिला समजावण्याचा प्रयत्न केला, पण पल्लवी डगमगली नाही. नंतर पल्लवीचा प्रियकर पोलिसांसह तिथे पोहोचला आणि वधूला सोबत घेऊन गेला.

## पुरातन ठेवा परत मिळाला




संगीतकार स्टिफन मॉरिस यांना त्यांचं हरवलेलं व्हायोलिन हे वाद्य परत मिळालं आहे. लंडनच्या दक्षिण भागात रेल्वेने प्रवास करताना त्यांचं व्हायोलिन हरवलं होतं. हे व्हायोलिन ३१० वर्षांपूर्वीचं असल्यामुळे मॉरिस यांच्या जीवाची घालमेल सुरु होती. जुन्या काळातलं व्हायोलिन परत मिळू शकत नसल्याने ते खूपच अस्वस्थ झाले होते. मात्र १० दिवसांनी त्यांना व्हायोलिन मिळालं. या पुरातन व्हायोलिनची किंमत थोडीथोडकी नाही. हे वाद्य खरेदी करण्यासाठी तुम्हाला २.५ लाख पाउंड म्हणजे जवळपास २.२८ कोटी रुपये द्यावे लागतील. व्हायोलिनची ही किंमत ऐकून कोणीही उडेल. डेव्हिड टेक्लर यांनी १७०९ मध्ये हे व्हायोलिन तयार केलं होतं. स्टिफन यांनी आपलं व्हायोलिन हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलीस कामाला लागते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचं फुटेज तपासून त्यांनी आरोपीला ओळखलंही होतं. ही माहिती मिळताच फक्त २४ तासांमध्ये आरोपीने स्टिफन मॉरिस यांच्याशी ट्विटरवरून (एक्स) संपर्क साधला आणि व्हायोलिन परत देणार असल्याचं सांगितलं. ठरवलेल्या ठिकाणी रात्री दहा वाजून दहा मिनिटांनी स्टीफन यांना व्हायोलिन मिळालं. व्हायोलिन परत केल्यामुळे आरोपीला ताब्यात घेणार नसल्याचं लंडन पोलिसांनी सांगितलं.

## चित्रविचित्र वस्तूसंग्रहालये

भारतात चित्रविचित्र वस्तूसंग्रहालयं आहेत. अहमदाबादमधल्या व्हिचर वस्तूसंग्रहालयात बरीच भांडी बघायला मिळतात. या संग्रहालयात चार हजारपेक्षा अधिक भांडी मांडण्यात आली आहेत. ही सगळी भांडी विविध धातूंपासून बनवण्यात आली आहेत. प्राचीन काळातली भांडी इथे पहायला मिळतात. राजधानी दिल्लीत सुलभ आंतरराष्ट्रीय टॉयलेट म्युझियम आहे. इथे वेगवेगळ्या आकाराची शौचालयं पहायला मिळतात. हे संग्रहालय दिल्लीतलं खास आकर्षण आहे. इथे पुरातन शौचालयंही आहेत. हे संग्रहालय के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. दिल्लीतच एक बाहुल्यांचं संग्रहालय आहे. या संग्रहालयात अत्यंत सुंदर आणि आकर्षक बाहुल्या पहायला मिळतात. हे म्युझियमही के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. गुवाहाटीतल्या मायोंग गावात खूपच विचित्र संग्रहालय आहे. या संग्रहालयात मानवी कवट्या तसंच जादूटोण्यासाठी लागणाऱ्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. जादूटोना संग्रहालय याच नावाने ते ओळखलं जातं.



